॥ श्री ॥
॥ बाबा ॥

# काकडा

सद्-गुरूराया गजानना तव काकडा करीते
उध्दारास्तव बहू आदराने चरण तुमचे धरीते
अज्ञानाची निशा मावळली बाबा कृपा कटाक्षांनी
आशा खटयाळ सखी नाचविते आम्हा
त्या सटवीला आहे आसरा माया-मोहाचा
त्याचा टिकाव कधी ना लागे बाबा तुम्हा पुढती साचा
षड्-रिपु बेटे खटयाळ मोठे करीती निर्माण भ्रम भोवरा
त्या भोव-यात देती आम्हा टाकून...परी त्या भोव-याला
तरून जाया बाबा पाय तुमचे नौका, बाबा पाय तुमचे नौका
त्या नौकेत भक्त बैसती तयास टाकू नका
हिच विनंती हीच इच्छा आम्हा सर्वांची

★★★★★